# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६२२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२८/०९/२०१६

**१) मंगळसुत्रास पॉलीश करून देतो असे सांगुन फसवणुक केली. :—**

दिनांक २७/०९/२०१६ रोजी ११.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी सौ. अंजली सुभाष पटले वय ३० वर्ष, रा. शांता कॉलोनी साकोली ही आपल्या घरी हजर असतांना यातील अनोळखी आरोपी इसमांनी एक्सपर्ट लिक्वीडचा प्रचार करण्यासाठी आलो असे सांगुन एका चांदीच्या करंडयाला पॉलीश करुन दिला आणि पुन्हा फिर्यादीने सोन्याचा मंगळसुत्र वजन ३० ग्रॅम कि. ७५,०००/—रु. चा पॉलीश करण्यासाठी दिला असता आरोपीतांनी आपल्या जवळुन एक डब्बा दिला व गॅस वर मांडले असता सदर मंगळसुत्र पॉलीश न करता घेवुन पळुन जावुन फिर्यादीची फसवणुक केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४२०,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. गांवडे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) कोर्टाचे आदेशाचे उल्लघंन केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २६/०९/२०१६ रोजी ११.३० ते १२.०० वा. दर. यातील आरोपीने गिरोला येथील गट क्र. १३७ मध्ये सरकारी जागेत अतिक्रमन करुन कर्मा धाबा उघडला होता सदर धाबा कोर्टाच्या आदेशाने मा. तहसिलदार सा. भंडारा यांनी हटविला होता. आरोपीने कोर्टाचे आदेशाचे उल्लघंन करुन जागेवर पुन्हा अतिक्रमन करुन टेन्ट लावुन धाबा सुरु केल्याने फिर्यादी सुभाष संभाजी चव्हान वय २७ वर्ष, रा. विद्यानगर गणेशपुर भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४४७,१८८ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो. स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) जादुटोना केल्याच्या कारणावरून शिविगाळ व जिवानिशी ठार मारण्याची धमकी दिली . :—**

दिनांक २५/०९/२०१६ रोजी १९.०० वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस तु जादुखोर आहेस माझ्या आईला जादु टोना केलास असे बोलुन शिविगाळ करुन जिवानिशी ठार मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी बलदेव बकाराम बागडे वय ६० वर्ष, रा. सितेपार यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ५०४,५०६(ब),३४ भांदवि. सहकलम ३(१),(३) म.जा.प्र.अ. सन २०१३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनी. नागरे पो. स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**४) भांडण करुन अश्लिल शब्दात शिविगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. :—**

दिनांक २६/०९/२०१६ रोजी २१.३० वा. दर. यातील आरोपी हे सार्वजनीक ठिकाणी शिविगाळ करीत होते. म्हणुन फिर्यादीने आरोपीतांना हटकले असता आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी सोबत भांडण करुन अश्लिल शब्दात शिविगाळ केली व जिवाने मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादी सौ. सारीका धमेंद्र धकेता वय ३४ वर्ष, रा. बाळापुर यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २९४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पो. स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–

दिनांक २७/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १०३ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०३ केसेस, तिन सिटर वाहनांवरती ११ केसेस व ईतर वाहनांवरती ८९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.